संशोधन आराखडा

समृद्धी महामार्गातील भूमीग्रस्त शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास

विशेष संदर्भ :- नांदेड जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानव विज्ञानशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषय पीएच.डी.पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रबंधाचा गोषवारा

(ऑगस्ट- 2024)

संशोधक

देशमुख प्रमोद माधवराव

मार्गदर्शक

प्रा.डॉ.एस.पी.घायाळ

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरूर ताजबंद,लातूर.

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

1.1) प्रस्तावना:-

समृद्धी महामार्गातील भूमीग्रस्त शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती चा समाजशास्त्रीय अभ्यास हा संशोधनाचा विषय आहे. समृदधी महामार्ग म्हणजेच **मुंबई - नागपूर द्रुतगती मार्ग** महाराष्ट्र समृदधी महामार्ग होय याचेच नाव **हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृदधी महामार्ग** असे ठेवले आहे. हा महामार्ग वाहतुकीसाठी सुरु झाल्यावर **मुंबई ते नागपूर आवघ्या 6 ते 7 तास मध्ये प्रवास** करीता येईल. हा महामार्ग भारतीय जनता पार्टीच्या कार्यकाळात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्याच्या संकल्पनेतून या मार्गला मान्याता मिळाली. हा मार्ग 31 मे 2017 रोजी प्रोजेक्ट रिपोर्ट प्रस्तुत करुन मार्गच्या निर्मीतीस प्रारंभ झाला हा मार्ग मे 2026 पर्यंत पुर्ण होण्याची संभावना आहे. हा मार्ग एकूण 701 कि.मी. लांबीचा 8 पदरी 2120 मीटर रुंदीचा नियोजत माहामार्ग आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबईला उपराजधानी नागपूरशी जोडले गेले. हा महामार्ग 10 जिल्यांतून थेट व इतर 14 अप्रतेक्ष जिल्हातुन व 24 तालुक्यातुन 390 गावामधुन जाणार आहे. मुंबई नागपूर 7 तासात पूर्ण होईल. या प्रकल्पासाठी सध्या 56,000 कोटीचा खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ या प्रकल्पाची आंबजावणी करणारी संस्था आहे सपाट जमिनीवर या मार्गावर वाहनांची वेगमर्यादा ताशी 150 किमी असेल व सह्याद्रीच्या घाटात ताशी 100 किमी असेल राज्य सरकार या महामार्गावर 24 शहरे तयार करणार आहे या शहरात अत्याधुनिक आरोग्या सुविधा कौश्यल्य व्यस्थापन केंद्र आई टी पार्क आणि शैक्षणिक संस्था असतील. या प्रकल्पात **10 जिल्ह्यातील 28,280 हेक्टर जमीन अधिग्रहित केली गेली आहे, 8520 हेक्टर महामार्गासाठी** वापरली जाणार आहे तर **10,800 हेक्टर हि नवीन नागरासाठी** असेल. या प्रकल्पासाठी बँकांकडून 28,000 कोटी रूपयाच्या कर्जाची गरज आहे . महामार्गावरील पूर्व बांधकाम कार्याचा वेग वाढवण्यासाठी या प्रकल्पाला पाच पॅकेजमध्ये विभागण्याचा निर्णय घेतला आणि प्रत्येक पॅकेज तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी स्वतंत्र सल्लागार कंपनी नेमली नागरी काम आता 16 पॅकेजमध्ये विभाजित करण्यात आले आहे. हा गतीमार्ग ठाणे, नाशिक ,अहमदनगर, औरंगाबाद, जालना, बुलढाणा वाशीम जिल्हा अमरावती, वर्धा, आणि नागपूर या **दहा प्रत्येक्ष जिल्ह्यातून** जाईल. तसेच **इतर 14 जिल्हे** चंद्रपूर, भंडारा, गोंदिया,गडचिरोली, यवतमाळ अकोला, हिंगोली, परभणी, नांदेड, बीड ,धुळे ,जळगाव, पालघर आणि रायगढ़, या अप्रत्यक्ष जिल्ह्याचा पण यामध्ये समावेश आहे. **हा मार्ग 120 मीटरचा** असेल , यामधला मध्यवर्ती दुभाजकाचा भाग हा 22.5 मीटर चा आहे. यात दोन्ही बाजूला 4-4 अशा **आठ मार्गिका लेन्स असतील**. जर भविष्यात एखादी मार्गिका वाढवायची झाली तर त्यासाठी रस्त्याच्या मध्यात असलेल्या मोकळ्या भागाचा उपयोग करता येईल. त्यामुळे भविष्यात जर नवीन मार्गिका हव्या असतील तेंव्हा त्यासाठी 120 मीटर्स आखणीबाहेरील जमिनीची गरज लागणार नाही. या प्रकल्पात 50 हुन अधिक

उड्डाणपूल आणि 24 हुन अधिक छेदमार्ग (इंटरचंजेस) असणार आहेत. या खेरीज या मार्गावर 5 पेक्षा जास्त बोगदे, वाहनासाठी महामार्गाखालून जाणारी 400 हुन अधिक भुयारी मार्ग तर पादचाऱ्यांसाठी 300 हुन अधिक भुयारी मार्ग अनेक मोक्याच्या ठिकाणावर बांधनयेत येणार आहेत. त्यामुळे मुख्य गती मार्गावरील वाहतूक कोणत्याही व्यत्ययाशिवाय सुरळीत चालू राहील. तसेच स्थानिक जनतेलाही त्यांच्या दळण वळणात महामार्गाचा कोणताच अडथळा होणार नाही. आणि अपघात टाळले जातील. या गतिमार्गावरील प्रवेश व बाहेर पडण्याच्या ठिकाणी नियंत्रणे असतील. महामार्गावर जेवढे अंतर कापले गेले त्यानुसार टोल आकारला जाईल. महामार्गावर स्वयंचलित टोल आकारणी (self-Toll plaza) बसवण्याचा प्रस्ताव आहे. या द्रुतगती महामार्गाच्या कडेला असलेल्या पूरक मार्गामध्ये सेवा वाहिन्या जसे ऑप्टिकल फायबर केबल्स, (optical fiber cable) गॅस पाईप लाईन (Gas pipeline) आणि वीज वाहतूक करणाऱ्या लाईन टाकल्या जातील.

नांदेड जिल्ह्या ऐतिहासिक माहिती -

नांदेड शहर हे महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागात असलेले आणि नांदेडजिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय आहे. या शहराला ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा लाभलेला आहे. नंदागिरी उर्फ नंदीग्राम या प्राचीन किल्ल्याच्या नावावरून या शहराला प्रथम नंदीग्राम आणि कालांतराने अपभ्रंश होऊन नांदेड हे नाव पडले असल्याचे सांगण्यात येते. नांदेड शहरात शिखांचे दहावे आणि शेवटचे गुरू, गुरू गोविंदसिंह यांच्या समाधीस्थळी बांधलेला गुरुद्वारा **तख्त सचखंड श्री हुजूर अबचलनगर साहिब** आहे. काही वर्षांपूर्वी 2008 येथे शीख धर्माच्या 'गुरू-ता-गद्दी' हा गुरुग्रंथास धर्मगुरूचा सन्मान प्रदान केल्याच्या घटनेस तीनशे वर्ष पूर्ण झाल्याचा सोहळा संपन्न झाला. नांदेड हे मराठी कवी रघुनाथ पण्डित आणि वामन पण्डित यांचे जन्मस्थान आहे. कवी दे.ल. महाजन, कवी वा.रा. कांत, साहित्यीक नरहर कुरुंदकर, इतिहासाचार्य तात्यासाहेब तथा अंबादास कानोले, संगीत महर्षी अण्णासाहेब गुंजकराची ही कर्मभूमी. मध्ययुगीन काळातील धर्मपंडीत 'शेष' घराणे इथलेच. नांदेड जिल्ह्याला संस्कृत कवींचे शहर असेही म्हणतात. हे शहर 'गोदावरी नदीच्या' काठी वसलेले आहे. येथे नंदगिरी नावाचा किल्ला आहे. शहरालगत विष्णूपुरी धरण हा आशिया खंडातील सर्वात मोठा उपसा जलसिंचन प्रकल्प येथे आहे. नांदेड जिल्ह्यात नांदेड सह 16 तालुके आहेत त्यांची नावे पुढीप्रमाणेनाव - मुदखेड,लोहा,नायगांव,बिलोली,देगलुर,धर्माबाद,कंधार,हिमायतनगर,हदगाव, हिमायतनगर,माहूर,किनवट,भोकर,उमरी,अर्धापूर,व नांदेड.नांदेड जिल्ह्यात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विष्णुपूरी येथे आहे,श्री गुरूगोविंदसिंहजी अभियांत्रिकी व तांत्रिक महाविद्यालय या महत्त्वाच्या शैक्षणिक संस्था आहेत.

नांदेड जिल्ह्या सामाजिक व धार्मिक माहिती -

नांदेड विविध जाती व धर्माचे लोक राहतात. प्रामुख्याने मुस्लिम,बौद्ध,शीख, या धर्मातील लोकांची संख्या अधिक असून जैन व सिंधी पारशी धर्मातील लोकांची संख्या कमी आहे. नांदेड शहरात शिखाचे दहावे गुरु श्री गुरुगोविंद सिंगजी याचा समाधी ठिकाणी गुरुद्वारा प्रसिद्ध आहे. त्यामुळे शहराला ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले आहे. या शहरात प्रामुख्याने हिंदू,मुस्लिम आणि महत्त्वाची म्हणजे शीख धर्मियांची संस्कृती अस्तित्वात आहे. येथील गोदावरी नदीच्या किनारी नंदी या महादेवाच्या वाहनाने नृत्य केले म्हणून या शहरास नांदेड असे नाव पडले आणि याच्या मुळेच इथे हिंदू संस्कृती अस्तित्वात आली .दाभड येथे भरणारी महाधम्म परिषद, बाराड चैत्र पौर्णिमा यात्रा,हुजुर साहिब नांदेड दसरा हल्लाबोल महहला,भगवान बालाजी दसरा रथयात्रा नांदेड,दाभाड सत्य गणपती, कंधार येथील हजिसाया उरूस, माहूर येथील नारळी पौर्णिमा निमित्त भरणारी परिक्रमा यात्रा तसेच नवरात्र महोत्सव, दत्तशिखर माहूर येथील दत्त जयंती सोहळा, सोनखेड येथील जगदगुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या जयंती निमित्त साजरा होणारा बिजोत्सव सप्ताह, हिन्दू व शीख समुदायाचा दसरा हे वार्षिक सोहळे अत्यन्त छान असतात . रावणदहन,दीपावली,सन्दल,रमजान-ईद,बकरी-ईद,ईद-ए-मिलाद, शिवजयन्ती,डॉ.बाबासाहेब आम्बेडकर जयंती, अण्णा भाऊ साठे जयन्ती, बुद्ध पौर्णिमा, गणेश उत्सव हे दिवसही उत्साहाने साजरे होतात. जिल्ह्याची संलग्न सीमा नांदेड जिल्हा हा गोदावरीच्या खोऱ्यात आग्नेय महाराष्ट्रात वसला आहे.कामारेड्डी, निर्मल व निझामाबाद बिदर (कर्नाटक), यवतमाळ, लातूर, परभणी व हिंगोली हे जिल्हे नांदेड जिल्ह्याच्या सीमेस लागून आहेत.

जिल्ह्याची भौगोलीक माहिती –

नांदेड जिल्ह्याची क्षेत्रफळ 10422 चौ. किमी आहे.जिल्ह्याची लोकसंख्या इ.स. 2011 च्या जनगणनेनुसार 3,35,566इतकी आहे.जिल्ह्यात सरासरी 953मीमी पर्जन्यमान आहे.जिल्ह्यातील प्रमुख नद्या गोदावरी,मांजर,असणा,मन्याड व पैनगंगा या आहेत.

1.2) अध्यायन क्षेत्र – संशोधन क्षेत्रातील गावाची नावे-

हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग **नांदेड - जालना** संशोधनासाठी प्राथमिक स्वरूपात विष्णुपुरी,पांगरी,कल्हाळ,सुगाव,वांगी,रहाटी,जैतापुर,नाळेश्वर,पिंपळगाव,कोरका,गुंडेगाव,बाभुळगाव,तुप्पा,काकांडी ही गावे निवडली आहेत या गावांचा अभ्यास केला जाणार आहे.

1.3) समस्या सूत्रण -

हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा मराठवाडा व विदर्भ यामधील कमी विकसित असलेल्या जिल्ह्याना विकसित होण्यामध्ये मोलाचे योगदान देणारा ठरणार आहे .त्याचबरोबर या भागातील मोठ्या प्रमाणात शेतकरी हे भूमिग्रस्त होतील व त्याचा परिणाम हा एकंदरीत शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनावर पडेल व शेतकरी भूमिग्रस्त झाल्यामुळे त्यांना पर्यायी इतर व्यवसायाकडे जावे लागेल. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रतील औदोगिकदृष्ट्या अविकसित असलेल्या जिल्हामधून **नवीन उद्योग,व्यापार,सुगम दाळणवळण ,गॅस पाईप लाईन ऑप्टिकल फायबर केबल,कृषी केंद्र सुरु होईल.** सध्या जालना-नांदेड प्रवासासाठी असणाऱ्या राज्य व राष्ट्रीय महामार्गालाच वाढवून त्याची दुरुस्ती करून कमी वेळेत जालना- नांदेड प्रवास करणे शक्य असताना नवीन प्रकल्पावर कोट्यवधी रुपयांचा गुंतवणूक होणार आहे. या प्रस्तावित महामार्गात **1995 शेतकऱ्यांची तब्बल 2200 हेक्टर जमीन बाधित होणार आहे.** समृद्धी महामार्गाद्वारे **नांदेड – जालना** ही दोन शहरे जोडली जाणार आहेत. याद्वारे **शहरांतील 226 किलोमीटरचे अंतर 179 किलोमीटर** एवढे **कमी होईल** तसेच मुंबई आणि नांदेड दरम्यानचा 12 तासाचा प्रवासही निम्यावर येणार आहे. परभणी,हिंगोली,जालना,नांदेड या चार जिल्ह्यातील 110 गावातून हा द्रुतगती मार्ग जाणार आहे.

1.4) विषय निवडीचे कारण -

समृद्धी महामार्गातील भूमीग्रस्त शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती चा समाजशास्त्रीय अभ्यास हा संशोधनाचा विषय आहे.यात भूमीग्रस्त शेतकऱ्याच्या सामाजिक आर्थिक स्थिती वर प्रकाश टाकण्याच्या प्रयत्न संशोधक करणार आहे. संशोधन विषयाची जवळुन ओळख करुन घेणार आहे तो अभ्यास भावी संशोधकांसाठी प्रेरणादायी ठरेल. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा मराठवाडा व विदर्भ यामधील कमी विकसित असलेल्या जिल्ह्याना विकसित होण्यामध्ये मोलाचे योगदान देणारा ठरणार आहे . या प्रकल्पामुळे महाराष्ट्रतील औदोगिकदृष्ट्या अविकसित असलेल्या जिल्हामधून नवीन उद्योग,व्यापार,सुगम दाळणवळण,गॅस पाईप लाईन ऑप्टिकल फायबर केबल,कृषी केंद्र सुरु होईल. त्यामुळे या भागातील जनतेचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचावेल हिच अपेक्षा महाराष्ट्रा शासनाची आहे. हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन मी संशोधक विधार्थी म्हणुन या भागातील नांदेड़ जिल्यातील भुमीग्रस्त शेतकऱयांची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यास करणार आहे. समाजशाश्त्रीय द्रष्टीकोनातून वरील संदर्भात विचार केल्यास या प्रकल्पाचे उद्देशयाना अनुसरून गाव पातळीवर शेतकरी याची भूमिका विचार आणि उद्देश यातील साम्य भेद तपासून पाहणे. हा उद्देश डोळयासमोर ठेऊन या अध्ययन क्षेत्राची निवड करण्यात अली आहे.

1.5) अध्ययनाचे महत्त्व –

महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा संपूर्णपणे नव्याने उभा राहणार आहे मुंबई व नागपूर मधील अंतर, प्रवासी वाहतुकीस 8 तासात व मालवाहतुकीस 16 तासात पार करता येईल या महामार्गामुळे महाराष्ट्रातील राज्यातील 36 जिल्हयापैकी 24 जिल्हे एकमेकांन जोडले जातील हा महामार्ग राज्याच्या 6 महसूल विभागांपैकि 5 विभागात असलेल्या 10 जिल्हयातून मधून जाणार आहे यामुळे महाराष्ट्रातील दूरवरचे जिल्हे मुंबईतील बंदराशी आणि जेथून नागपूरच्या हवाई मार्गाने जगात कुठेही मालवाहतूक होईल अशा मल्टिमॉडेल इंटरनॅशनल कार्गी हब अँड एअरपोर्टला नागपूरशी जोडले जाणार आहेत यासाठी लागणारी जमीन एका विशिष्ट पद्धतीची योजना राबवून जमीन धारकांकडून एकत्र केली जाणार आहे. जिथे जमीनधारक मालक या सर्व योजनेचे भागीदार होतीलच या योजने अंतर्गत प्रस्तावित कृषी समृद्धी केंद्राचा म्हणजेच नवनगरांचाही विकास होणार आहे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा प्रकल्प देशांतर्गत आणि अंतर राष्ट्रीय गुंतवणुकीच्या आधारे राज्यातल्या ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणार आहे. या मार्गातील सर्व अडथळे दूर झाल्याने महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यानी प्रकल्पांचे काम डिसेंबर 2021 पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत दहा जिल्ह्यांमध्ये मिळून 20 पेक्षा अधिक कृषी समृद्धी केंद्रे आहेत. या गतिमार्गास जिथे इतर राज्य किंवा राष्ट्रीय मार्ग छेडतील तिथे हि कृषी समृद्धी केंद्रे विकसित केले जाणार आहेत.

2) साहित्य सर्वेक्षण –

भारत देशात सर्वात मोठा राष्ट्रीय महामार्ग म्हणजे सुवर्णचतुर्थ महामार्ग आहे यात देशातील चार मोठे औधोगिक व महानगरीय शहरे या महामार्ग द्वारे जोडले गेले आहेत त्यात दिल्ली,मुंबई,बेंगलोर,व कोलकत्ता या शहरांना जोडले गेले आहेत. हा महामार्ग पूर्ण करताना विविध राज्यतील बरेच शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहित केली गेली. या महामार्गाचे एकूण लांबी 5846 किमी आहे तो जानेवारी 2012 मध्ये पूर्ण झाला.

उत्तर - दक्षिण महामार्ग यात जम्मू काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत आहे हा महामार्ग एकूण 4000 किमी लांबीचा आहे. पूर्व - पशिमम महामार्ग हा पोरबंदर ते सिल्चर पर्यंत आहे या महामार्गाची लांबी 3400 किमी आहे. एकूण महामार्गाची लांबी 7400 किमी आहे.

भूसंपादन कायदे-

संपादनाला नियंत्रित करणारे कायदे भारतीय ट्रामवे कायदा, 1886, दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन कायदा, 1948, राष्ट्रीय महामार्ग कायदा, 1956, कोळसा बेअरिंग क्षेत्र संपादन आणि विकास कायदा, 1957, पेट्रोलियम आणि खनिज पाइपलाइन (हक्काचे संपादन) यांचा समावेश आहे. जमीन) कायदा, 1962, भारतीय जमीन बंदर प्राधिकरण कायदा, 2010, मेट्रो रेल्वे (बांधकाम) कायदा, 1978, रेल्वे कायदा, 1989 आणि जमिनीत योग्य मोबदला आणि पारदर्शकतेचा अधिकार संपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसन कायदा, 2013 (LARR) आणि जो 1 जानेवारी 2014 पासून लागू झाला. 2013 पर्यंत, 1894 चा भूसंपादन कायदा भारतात भूसंपादन नियंत्रित करत होता. 31 डिसेंबर 2013 रोजी, भारताच्या राष्ट्रपतींनी "शेतकरी कल्याणाची दुहेरी उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी; देशाच्या धोरणात्मक आणि विकासात्मक गरजा त्वरित पूर्ण करण्यासाठी" अधिकृत आदेशासह एक अध्यादेश जारी केला. त्यानंतर अध्यादेशाला मान्यता देण्यासाठी एक दुरुस्ती विधेयक संसदेत मांडण्यात आले. लोकसभेने विधेयक मंजूर केले, जे राज्यसभेत मंजूर होण्याची प्रतीक्षा आहे. 30 मे 2015 रोजी, भारताच्या राष्ट्रपतींनी तिसऱ्यांदा दुरुस्ती अध्यादेश जारी केला.केंद्र सरकारने या प्रक्रियेचे नियमन करण्यासाठी अधिनियमांतर्गत जमीन संपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसन (सामाजिक प्रभाव मूल्यांकन आणि संमती) नियम, 2014 मधील वाजवी भरपाई आणि पारदर्शकतेचा अधिकार देखील बनविला आणि अधिसूचित केला आहे. जम्मू आणि काश्मीरमधील भूसंपादन जम्मू आणि काश्मीर भूसंपादन कायदा, 1934 द्वारे नियंत्रित केले जाते**.**

भारतीय संविधानिक स्तिथी मालमत्ता संदर्भात- ज्यांची मालमत्ता सार्वजनिक कारणासाठी बहुतेकदा व्यापक अर्थाच्या अधीन घेतली गेली आहे अशा व्यक्तींना भरपाई दिली जाईल असे यात सूचित केले आहे. भारतीय राज्यघटनेने मूळतः कलम 19 आणि 31 अंतर्गत मालमत्तेचा अधिकार ज्या जमीन समाविष्ट आहे प्रदान केला आहे कलम 19 ने हमे दिली आहे की सर्व नागरिकांना मालमत्ता प्राप्त करण्याचा ठेवण्याचा आणि विल्हेवाट लावण्याचा अधिकार आहे. कलम 31 मध्ये म्हटले आहे की कायद्याच्या अधिकाराशिवाय कोणत्याही व्यक्तीला त्याच्या मालमत्तेपासून वंचित ठेवता येणार नाही. ज्यांची मालमत्ता सार्वजनिक कारणासाठी बहुतेकदा व्यापक अर्थाच्या अधीन घेतली गेली आहे अशा व्यक्तींना भरपाई दिली जाईल असे. यात सूचित केले आहे. 1978 च्या 44 व्या घटनादुरुस्तीने मूलभूत हक्काच्या यादीतून मालमत्तेचा हक्क काढून टाकला आणि नवीन तरतूद कलम 300(ए) ज्यामध्ये अशी तरतूद करण्यात आली की कायद्याच्या अधिकाराशिवाय कोणत्याही व्यक्तीला त्याच्या मालमत्तेपासून वंचित ठेवता येणार नाही 44 वी घटनादुरुस्ती या दृष्टीने हे निश्चित केले की मालमत्तेचा अधिकार हा यापुढे मूलभूत

अधिकार नसून संविधानिक कायदेशीर हक्क वैधानिक अधिकार म्हणून आहे आणि उल्लंघन झाल्यास पीडित व्यक्तीला अनुच्छेद 226 अंतर्गत उच्च न्यायालयामार्फत उपाय उपलब्ध आहे भारतीय संविधान आणि संविधानाची कलम 32 अंतर्गत सर्वोच्च न्यायालय नाही राज्याने अधिग्रहित केलेली जमीन इमारत किंवा संरचनेसाठी बाजार मूल्यानुसार भरपाई देणे आवश्यक आहे संविधान अधिनियम 17 व्या दुरुस्तीद्वारे समाविष्ट केलेल्या कायदा 1964 मालमत्ता अधिकार हा मूलभूत अधिकार होता तेव्हा पूर्वीच्या निर्णयांमध्ये हे आढळून शकते जसे की ज्याने असे प्रतिपादित केले की कलम 31(2) मध्ये उपायोजित भरपाई शब्दाने पूर्ण भरपाई सुचित केली आहे म्हणजे संपादनाच्या वेळी मालमत्तेचे बाजार मूल्य आहे कायदेमंडळाने देय म्हणून काय निश्चित केले आहे याची खात्री करणे आवश्यक आहे. नुकसान भरपाई असणे आवश्यक आहे म्हणजेच मालक ज्यापासून वंचित आहे. त्यांच्या समतुल्य इतरत्र न्यायमूर्ती यांनी निर्णय दिला सात जुलै 1983 रोजी महाराष्ट्र राज्य विरुद्ध चंद्रभान ताले की की न्याय सामाजिक आर्थिक आणि राजकीय आणि समानता या उद्दिष्टांशी विसंगत असल्यामुळे मालमत्तेचा मूलभूत अधिकार रद्द करण्यात आला आहे आणि संधीची आणि संविधानाने विचार केल्याप्रमाणे समाजवादी लोकशाही प्रजासत्ताकाची स्थापना केली. जुन्यांच्या जागी संपत्तीची नवीन संकल्पना आणण्याची कारण नाही लेझर फेअर चा सिद्धांत आणि कार्यक्षमतेच्या नावावर एक नवीन कुलींवर्ग तयार केला कार्यक्षमतेचा अनेक पैलू आहेत आणि आपल्यासारख्या विकसनशील समाजाच्या व्यापक पुणे भिन्नगर्जा पूर्ण करण्यासाठी कार्यक्षमतेची एक अचूक चाचणी शोधणे बाकी आहे कार्यक्षमतेच्या संकल्पना न्यायमूर्ती व चिन्हप्पा रेड्डी यांनी अयोग्य तिच्या अटीसह मांडली आहे. भारतात या सामाजिक घटकांच्या मालमत्तेचे अधिकाराच्या परिचयाने एक नवीन टप्पा सुरू झाला होता केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्या 1997 मध्ये न्यायमूर्ती के.के. यांनी हे नमूद केले.

3.1) संशोधन पद्धती-

प्रस्तुत संशोधन पद्धती मध्ये गुणात्मक व संख्यात्मक अशा **मिश्रित** स्वरूपाच्या संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच संशोधन पद्धतीमध्ये **अन्वेषणात्मक** संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाचे उददेश -

1) समृद्धी महामार्ग (नांदेड - जालना एक्सप्रेस वे) प्रकल्पा मुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्याचा सामाजिक व आर्थिक स्थिती जाणून घेणे.

2) अध्ययनासाठी निवडलेल्या गावाचा ऐतिहासिक,भौगिलिक, सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

3) समृद्धी महामार्ग प्रकल्पाचा बाधित शेतकऱ्यावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

4) बाधित शेतकऱ्याना विकासासाठी उपाय योजना सुचवणे.

गृहीतकृत्य-

1. समृद्धी महामार्गात भूमी सरकारकडे हस्तांतरित केली गेली, त्यामुळे भूमीचे प्रमाण कमी झाले.
2. समृद्धी महामार्गात शेतकरी वर्ग भूमिग्रस्त झाला परिणामतः इतर व्यवसायाकडे वळला.
3. समृद्धी महामार्गात मिळालेल्या भूमीच्या मोबदला मिळाला म्हणून शेतकरी वर्ग समृद्ध झाला.
4. समृद्धी महामार्गातील भूमिग्रस्त शेतकरी आर्थिक मोबदल्याचे नियोजन करू शकले नाही परिणाम त्यांची सामाजिक स्थिती खालावली.

नमुना निवड पद्धती -

प्रस्तुत संशोधन पद्धतीमध्ये एकूण **200 नमुना संकलित करण्यात येणार आहे** व हा नमुना **सहेतुक नमुना निवड** पद्धतीद्वारे हाताळण्यात येणार आहे.त्यात जिल्यातील बाधित शेतकऱ्याच्या चौदा गावांपैकी एका गावातील किमान २० नमुना घेणार आहोत.

तथ्ये संकलन-

प्राथमिक माहिती - प्रस्तुत संशोधनांमध्ये प्राथमिक माहितीचे संकलन **अनुसूची** पद्धतीद्वारे करण्यात येणार आहे.

दुय्यम माहिती - प्रस्तुत संशोधनमध्ये दुय्यम माहिती ही संस्थात्मक रेकॉर्ड्स, सरकारी विभागांमध्ये गोळा केलेली माहिती तसेच इंटरनेट शोध किंवा लायब्ररी जर्नल ,पेपर्स, मासिके, विविध पुस्तके, शासकीय पत्रक, वर्तमानपत्रे यांद्वारे दुय्यम माहितीचे संकलन करण्यात येणार आहे.

4.1) प्रकरणीकरण

प्रस्तुत संशोधनाची विभागणी सहा प्रकरणात करण्यात आलेली आहे.

1) **प्रस्तावना-**

   या प्रकरणामध्ये विषयास अनुसरून संपूर्ण प्रकारची माहिती या प्रकरणामध्ये मांडण्यात येणार आहे.

2) **साहित्य सर्वेक्षण-**

   या प्रकरणामध्ये पूर्वी झालेले अभ्यास अहवाल,संशोधन,संशोधन लेख याचा आढावा घेण्यात येणार आहे.

3) **संशोधन पद्धती व तथ्याचे विश्लेषण** –

   या प्रकरणामध्ये संशोधक कोणती संशोधन पद्धती वापरणार आहे व कोणत्या प्रकारे संशोधक तथ्यांचे संकलन करणार आहेत याची मांडणी करण्यात येणार आहेत.

4) **समृद्धी महामार्गातील भूमिग्रस्त शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन-**

   या प्रकरणामध्ये शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन केले जाणार आहे.

5) **भूमिग्रस्त शेतकरयांनी मिळालेल्या आर्थिक मोबदल्याचा कोणत्या प्रकारे वापर केला याचा अभ्यास करणे.**

6) **निष्कर्ष व शिफारशी**
7) **संदर्भ ग्रंथ व संदर्भसूची**

संशोधांनासाठी लागणारा कालावधी –

सदरील संशोधन पूर्ण करण्यासाठी 30 डिसेंबर 2026 पर्यंतचा अंदाजित कालावधी लागेल.

संदर्भग्रंथ सूची –

1) आगलावे प्रदीप (2008) संशोधन पद्धती साईनाथ प्रकाशन, नागपुर.
2) 2011 जनगणना अहवाल
3) प्रोजेक्ट महामार्गे नकाशा
4) तहसिलदार याची सूचनापत्रक
5) विविध वर्तमानपत्रातील लेख
6) C.R.Kothari-Research methodology book
7) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब क्रमांक 362
8) गाव नकाशा
9) शासनाचे महामार्गा संदर्भमध्ये परिपत्रके व
समृद्धी महामार्गातील शासनाची महितीपुस्तिका

संशोधक

देशमुख प्रमोद माधवराव

(एम.ए.समाजशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. एस.पी.घायाळ

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरूर ताजबंद,लातूर.